**RNI No. MAHBIL /2009/40124**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

**वर्ष १२, अंक ४(२)]** **शनिवार, फेब्रुवारी २८, २०२६/फाल्गुन ९, शके १९४७** **[पृष्ठे ३, किंमत : रुपये २६.००**

**असाधारण क्रमांक ६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानपरिषदेत दिनांक **२८ फेब्रुवारी, २०२६** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानपरिषद नियम **१११** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. C. BILL No. I OF 2026.**

A BILL
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

**सन २०२६ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

२०१७ चा महा. ६. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून,
२०२६ चा महा. १. त्यांनी दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्त्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, १८ फेब्रुवारी २०२६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०९ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १०९ मध्ये, पोट-कलम (३) मधील,— २०१७ चा महा. ६.

(१) खंड (घ) मधील, विद्यमान परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु आणखी असे की, शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ करिता, राज्य शासनास, १५ मार्च २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी इरादा पत्र देता येईल.";

(२) खंड (छ) मधील, दुसरे परंतुक व तक्ता वगळण्यात येईल.

सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ(सुधारणा) अध्यादेश, २०२६, हा याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२६ चा महा. अध्या. १.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) याच्या कलम १०९ मध्ये, नवीन महाविद्यालय किंवा नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी किंवा सॅटेलाईट केंद्र सुरू करण्यासाठी परवानगीच्या कार्यपद्धतींची तरतूद केलेली आहे. उक्त कलम १०९ च्या पोट-कलम (३) च्या खंड (घ) मध्ये अशी तरतूद केली आहे की, विद्यापीठाने शिफारस केलेल्या अर्जांपैकी, राज्य शासन, उक्त कलम १०९ च्या खंड (ग) अन्वये विद्यापीठाच्या शिफारशींनंतर लगतनंतरच्या वर्षाच्या ३१ जानेवारी रोजी किंवा त्यापूर्वी इरादा पत्र देऊ शकेल.

२. स्थानिक प्राधिकरणांच्या निवडणुकांच्या आचारसंहितेमुळे, शासनास, विहित कालावधीत, इरादा पत्र देणे शक्य झाले नाही. म्हणून, शासनास, शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी उच्च शिक्षणाचे महाविद्यालय किंवा उच्च शिक्षण संस्था सुरु करण्याकरिता राज्य शासनाकडून इरादा पत्र देण्याचा दिनांक वाढविता यावा म्हणून, कलम १०९ च्या पोट-कलम (३) च्या खंड (घ) मध्ये सुयोग्य सुधारणा करणे इष्ट आहे असे वाटले.

३. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२६ (२०२६ चा महा. अध्या. १), हा प्रख्यापित केला होता.

४. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमांत रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६.

**चंद्रकांत (दादा) पाटील,**
उच्च व तंत्रशिक्षण मंत्री.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक २८ फेब्रुवारी, २०२६.

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.